१० मार्च २०२१

मासिकांक १

# "ती" चं पान



संपादक :- सौ सायली पेशवे देशपांडे

तिच्याकडून सगळ्यांसाठी...

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | सौ. सायली अक्षय देशपांडे |
| २. | दोन शब्द | दिगंबर आचार्य |
| ३. | स्त्री जन्मा ही तुझी कहाणी | प्राजक्ता बर्वे |
| ४. | आपल्यातली ती | स्वर्णिमा कमलवार |
| ५. | प्रामाणिक असावं | सौ. अपूर्वा किटकरू भालेराव |
| ६. | तुला फक्त तू जन्म देतेस येथे | सौ. तृष्णा आंबेकर |
| ७. | स्त्री | मृण्मयी सारंग |
| ८. | बाळा जो जो रे | भार्गवी बाबरेकर |
| ९. | आई हवी पण मम्मी नको | निर्मिती देवलासी |
| १०. | थोडं तिच्याविषयी | सौ. प्रांजली बाविस्कर |
| ११. | मला कळलेली ती | सौ. सायली अक्षय देशपांडे |
| १२. | समारोप | |


## जागतिक महिला दिन विशेषांक

# प्रस्तावना

रसिकहो, "ती" चं पान याविषयी थोडं आधी सांगु इच्छिते. जागतिक महिला दिन हा दर वर्षीच येत असतो आणि तो आपण साजरा करतो. मुळात जी शक्ती स्वरूपिणी आहे तिच्यासाठी एक दिवस कसा पुरेसा असेल? संसार आणि इतर अनेक जबाबदाऱ्या पार पाडत पाडत तिचं स्वतःचं असं पान लिहायचं राहून जातं. तेच पान इथे हक्काने लिहिता यावं यासाठी या मासिकाचं नाव **"ती" चं पान अर्थात तिच्याकडून सगळ्यांसाठी !**

ती वेगवेगळ्या भूमिकांमध्ये शोभून दिसते कधी बाई ते आई असा तिचा प्रवास. त्यात नात्यांचे अनेक पदर पैलू. " आकाशवाणी" हिला मध्यवर्ती ठेवत यात असलेले सगळे लेख हे आकाशवाणीत निवेदिका म्हणून कार्यरत असणाऱ्या किंवा तिथे रुजू होणाऱ्या सगळ्यांनी लिहिले आहेत. नागपूर आकाशवाणी येथे मी उद्घोषिका म्हणून कार्य करत असतांना अनेक मोठ्या आणि माननीय महोदयांशी माझा संबंध आला. तिथे असणारी प्रत्येक स्त्री ही एक गृहिणी तर होतीच पण आपल्या कामाच्या ठिकाणी सुद्धा आपलं काम चोख करायची. हे सगळं बघून मला अप्रूप वाटलं.

आपलं प्रासंगिक हे ON AIR जात असतांना असंख्य श्रोते तिला ऐकायचे तिचा आवाज ही तिची ओळख झाली. पण तेच पान कुठेतरी नमूद असावं असं मला मनापासून वाटलं म्हणून आम्ही " अभिवाचन" या समूहाची निर्मिती केली. त्यात वाचन,लेखन हा महत्त्वाचा भाग आहे. आणि आकाशवाणी मध्ये काम करत असतांना किती आणि काय बोलायला हवं याचा अंदाज होताच. आणि या प्रयत्नांना माझ्या सगळ्या आकाशवाणीतल्या सख्यांनी अगदी आनंदाने दुजोरा दिला आणि म्हणूनच हे सगळं शक्य झालं. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. आभार म्हणून त्यांना परकं करण्याची माझी इच्छा नाही त्यामुळे अभिनंदन! या पहिल्या वहिल्या आमच्या संकल्पनेला सुंदर असं मुखपृष्ठ तयार करून दिल्याबद्दल ओंकार देवचं विशेष कौतुक. साक्षात देव पाठीशी असतांना कसली भीती!

**तेव्हा ही तिच्या भावनांची शब्दबद्ध केलेली एक सुरेख शब्दयात्रा खास तुमच्यासाठी..!**

- सौ. सायली अक्षय देशपांडे

# दोन शब्द...

" रोजच्या व्यवहारात एकच पात्रता असणाऱ्या स्त्री-पुरुषांना मिळणाऱ्या वागणुकीतली तफावत आपण गृहीत धरून चालतो. घरीही वडील आणि आई यांच्या भूमिका वेगळ्या असतात आणि त्यांना मिळणारा मानही वेगळा असतो. जेव्हा एका समूहानं दुसऱ्या समूहावर केलेला अन्याय गृहीत धरला जातो, तेव्हा आपण तो करणाऱ्यांच्या गटात असणं, हे तो सहन करणाऱ्यांच्या गटात असण्यापेक्षा फायद्याचं असतं. मला स्वत:ला या गटात, म्हणजे 'पुरुषांच्या' गटात असल्याचा कितपत फायदा झाला, हे माहीत नाही. स्त्री आणि पुरुष यांच्यात बरोबरी होणं शक्य नाही, असं माझं सरळ, स्पष्ट आणि माझ्या अनुभवातून तयार झालेलं मत आहे. हो, म्हणजे शारीरिक कष्टाबिष्टाच्या कामात पुरुष बहुधा वरचढ ठरू शकतात, पण अशी निव्वळ अंगमेहनतीच्या बळावर तुलना आजच्या काळात करावी तरी कशाला? पुरुषापुरुषांत तरी ती कुठे केली जाते? डोक्याचा वापर हा तिथेही श्रेष्ठच मानला जातो. त्यामुळे ही एक गोष्ट बाजूला काढली तर मला वाटतं स्त्रिया या नक्कीच पुरुषांपेक्षा श्रेष्ठ मानल्या जायला हव्यात.

रूपासारखी गोष्ट जरी आपण 'सब्जेक्टिव्ह' आणि तुलनेसाठी काहीशी 'पोलिटिकली इनकरेक्ट' म्हणून बाजूला काढली, तरी कामातली शिस्त, 'मल्टिटास्किंग', भावनिक गुंतवणुकीचे अनेक पदर आणि वैचारिक स्पष्टता, हे गुण आपल्याला सामान्यत: स्त्रियांमध्येच अधिक प्रमाणात दिसतात. सर्जनशीलता हा घटक तसा स्त्री आणि पुरुष दोघांकडे समप्रमाणात जरूर आहे, पण पुरुषांना त्याचा अधिक फायदा झाला याला इतिहासच साक्ष आहे. पितृसत्ताक वर्चस्वामुळे प्राचीन काळापासून महिलांच्या वाट्याला दुय्यमत्व दिले जाते. अगदी आजच्या आधुनिक काळातही स्त्रियांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचे विविध स्तरावरील प्रकार समोर येत आहेत. संस्कृती आणि परंपरा यांच्या नावाखाली स्त्रीयांना अधिकाधिक बंधिस्त करण्याचे प्रकार वाढू लागले आहेत. प्रगतीच्या इतक्या वल्गना झाल्या नंतर आधुनिक म्हणवणाऱ्या समाजात सुद्धा स्त्री पुरुष समानतेचे वास्तव अस्तित्वात येण्यात अनेक मैल गाठणे बाकी आहे.

जागतिक महिला दिनानिमित्त सर्व महिलांवर शुभेच्छांचा वर्षाव होतोय.वर्षभर, आयुष्यभर महिलेचा सन्मान न करता,त्यांच्या मनाचा जराही विचार न करता,त्यांच्या मताचा सन्मान न करता केवळ आपले निर्णय त्यांच्यावर लादून एक दिवस शुभेच्छा देऊन महिलादिन साजरा होणार नाही. स्त्री....जसा हा शब्द तशीच ती. ती खूप हळवी आहे,कणखर आहे,कधी अल्लड तर कधी समंजस आहे...प्रेम करणार तर जीव ओवाळून टाकणार आणि राग करणार तर तोही टोकाचा... प्रत्येकीला बहारायचं असतं, फुलायचं असतं...फुलण्याचा,उमलण्याचा आणि मुक्तपणे वाहण्याचा क्षण तीला मिळावा आणि तिने तो आयुष्य म्हणून जगावा अशी ती...आपण सगळेच महिलादिनी शुभेच्छा देऊन आजच्या दिवशी ती विशेष असल्याचं दाखवतो. तिचं कौतुक करतो,पण खरंच रोजच्या जीवनात आपलं आयुष्य क्षणाक्षणाला समृद्ध करणाऱ्या स्त्रियांचं जगणं, जगणं म्हणून मान्य करतो का? आजच्या दिवशी का होईना पण प्रश्न विचारा ना स्वतःला सर्व स्त्री-पुरुषांनी. तुम्ही देताय तो क्षण आनंदाचा,समाधानाचा, स्वतःला मुक्तपणे उधळून टाकण्याचा, तुमच्या आयुष्यातील एकातरी स्त्रीला..?
आईला,बहिणीला,मैत्रिणीला,प्रेयसीला, पत्नीला, मुलीला...कुणालातरी.......???

**तो देणाऱ्या प्रत्येकाला... अश्या प्रत्येक क्षणासाठी झगडणाऱ्या, लढणाऱ्या आणि तो क्षण हक्काने जगणाऱ्या प्रत्येकीला जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!**



**संकलन – शब्दांकन - दिगंबर राजेंद्र आचार्य**

**टाटा सामाजिक विज्ञान संस्था – मुंबई**

# स्त्री जन्मा ही तुझी कहाणी

माया ममता उरात असोनी, प्रसंगी कणखर असते वाणी
पुण्यंच करोनी मिळते स्त्रीपण, स्त्री जन्मा ही तुझी कहाणी

वैद्यकीय सोय नसल्याने, माता भगिनी होत्या दिनवाणी
"आनंदी" राहून प्रेरित केले, स्त्री जन्मा ही तुझी कहाणी

शाळा शिक्षण ठाऊक नव्हते, चूल मूल अन फक्त गृहिणी
सावित्री ने चित्र बदलले, स्त्री जन्मा ही तुझी कहाणी.

महिला सबलीकरणासाठी,चंदनाप्रमाणे झिजल्या म्हणोनी
मावशी केळकर अमरच झाल्या, स्त्री जन्मा ही तुझी कहाणी

कस्फटा प्रमाणे फेकून दिधले, तरी चालशी तू अनवाणी
पात्रातून वाहते होऊन "सिंधू", स्त्री जन्मा ही तुझी कहाणी

कधी पार्वती अन् अष्टभूजा तू,कधी जिजाई कधी अहिल्या
इंग्रज ही बघ कापून उठला, ऐसी तू झाशीची राणी

रमा, इंदिरा, उषा कधी तू, कधी सायना तर कधी तू विद्या
आमुच्या ओठी तुझीच गाणी,स्त्री जन्मा ही तुझी कहाणी

खचलेल्याला बळ तू देते, गिळूनी अश्रू घर सावरते
वेळप्रसंगी दुर्गा होऊन, नैक असूरांचा वध करते

कुठलेही संकट आले तरीही, ओठी कायम अमृत वाणी
आदर आहे तव असण्याचा, स्त्री जन्मा ही तुझी कहाणी



- प्राजक्ता बर्वे

# “आपल्यातली ती…”

**'तिच्यावाचुनी शून्य अवघे चराचर, अशी सर्व्यव्यापी तिची चेतना।'**

**"ती" ची आपल्याला पहिल्यांदा ओळख होते , ती "आई" म्हणून. " यत्र नार्यास्तू पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता।"**

असं म्हणतात ज्या घरामध्ये स्त्रीला मान दिला जातो त्या घरात देवता निवास करतात. आणि म्हणूनच देवाला प्रत्येक घरात जाणे शक्य नव्हते म्हणून त्याने आई निर्माण केली अशी कल्पना केली जाते. खरं तर आपल्या प्रत्येकाच्याच आयुष्यात ती असते ..फक्त तिचं रूप वेगळं असतं... "ती" वेगळी असते प्रत्येकासाठी..तिच्या सोबत च्या नात्याचं नाव असतं वेगळं.. प्रत्येका साठी... कधी "ती" एक उत्तम मैत्रीण असते, तर कधी प्रेयसी, तर बायको. कधी आई, तर कधी ताई...पण "ती" सतत आपल्या सोबत असते...

दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडत आज "ती" समाजाचा आधारस्तंभ बनली. कधी प्रेमळ कन्या, तर कधी वात्सल्य पूर्ण माता, तर कधी सक्षम सहचारिणी अशी विविध नाती अत्यंत कुशलतेने "ती" निभवते. आणि आत्ता याच्याच जोडीला ती घरा बाहेरही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करते...

चूल आणि मूल इतकचं तिचं विश्व नाही हे तिला आत्ता कळतंय...त्याही पलीकडे आपलं स्वतःच एक स्वतंत्र असं विश्व आहे याची तिला जाणीव झाली आहे. ही दोन्ही विश्व सांभाळताना तिला बऱ्याच अडचणींना तोंड द्याव लागतं...अगदी तारे वरची कसरतच करावी लागते असही म्हणता येईल. पण तरीही कसलिही तक्रार न करता या दोन्ही विश्वांचा मेळ "ती" अगदी सहजतेने बसवते...

**"कधी शारदा ती कधी लक्षुमी , ती कधी भाविनी वा कधी रागिणी...**

**सहस्त्रावधी सूर्य झुकतात जेथे, स्वयंभू अशी ती दिव्य सौदामिनी..."**

अश्या या काळानुसार, परिस्थितीनुसार **सतत स्वतःला बदलणाऱ्या, actually सतत स्वतःला update करणाऱ्या "ती"ला, समोरच्याला जपताना स्वतः च स्वत्व जपणाऱ्या "ती" ला... तिच्यातल्याच एकीकडून सलाम!**



**- स्वर्णिमा कमलवार**

# प्रामाणिक असावं....!

या लेखाच्या शीर्षकाप्रमाणेच माझ्या आईने मला जे काही शिकवलं ते मी आज इथे शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न करतेय. हे सगळं लिहित असतांना आज आईचे आणि माझे जुने दिवस आठवले माहेर आठवलं..
मला असं वाटतं की 'प्रामाणिकपणा' हा एकमेव असा स्वभावगुण आहे जो स्वभाव माणसाला शून्यातून कुठे ही घेऊन जाऊ शकतो...

जर आपण स्वतःशी, आपल्या कामाशी, समाजात लोकांशी प्रामाणिक राहिलो तर आपल्याबद्दल होत असलेले समज-गैरसमज होणारच नाहीत...
खोटं बोलण्याची गरज भासणारच नाही...
जे आहे ते बोलून मोकळं होऊन जाण्यात जो आनंद आहे तो खरंच कशातच नाही.इतरांच्या आनंदात समाधान मानणं, हे हल्ली लोकांमध्ये आपल्याला दिसतच नाही. बरेच लोक इतरांसोबत घडत असलेल्या वाईट गोष्टींमध्ये स्वतःचं सुख मानू लागतात, आणि याला विकृतीच म्हटली जाईल...!

समाधानी असणं आणि प्रामाणिक असणं या दोन गोष्टी आपल्या आजूबाजूला घडत असलेल्या वाईट गोष्टींवर जालीम औषध आहे असं म्हणायला हरकत नाही.. उदाहरण घेतलं तर स्वतःशीच खोटं बोलून कितीतरी लोक पश्चात्ताप करून घेताना आपण समाजात वावरताना बघतोच.
ते म्हणतात ना... आयुष्यात डॉक्टर आणि वकिलाशी कधीच खोटं बोलू नये... अगदी तसंच!
हा नियम जर आपण स्वतःच्या आयुष्यात लागू केला तर..??

म्हणजे बघा ना काही दिवसांपासनं मी स्वतःच अनुभवतेय...
खूप फरक पडतो.
या दोन नियमांना, स्वभावांना आयुष्यात स्थान दिलं तर...!

जे जमतंय; त्याला हो म्हणायचं आणि जे जमत नाही त्या गोष्टीला उगाच 'हो' म्हणून स्वतःचा त्रागा करून घेऊन आपण समोरच्याचं नकळत मन सुद्धा दुखवतो हेही तितकच खरं...!!
हाच प्रामाणिकपणा तिच्यामुळे मला कळायला लागला ती म्हणजे माझी आई. खरंच आई आपली पहिली गुरु असते. आणि लहानपणी शिकल्याप्रमाणे आ म्हणजे आत्मा आणि ई म्हणजे ईश्वर या दोन अक्षरांना मिळून आई हा शब्द तयार होतो. देव इतक्या जगाचं पालकत्व अगदी प्रामाणिकपणे पार पाडतो आणि आई ही त्याचीच प्रतिकृती मग ती कशी चुकेल? हा विचार मुळातच आज कोणीही करत नाही. मला आठवतंय आईने लहानपणी याच प्रामाणिकपणाचे संस्कार माझ्यावर केले. आणि तोच प्रामाणिकपणा आज मला कामात पडतोय. आपल्या आजूबाजूला तिच्या रुपातून साक्षात शक्ती वसत असते हे आपल्याला कळायला लागतं तेव्हा आपला प्रवास बाई म्हणून सुरू झालेला असतो आणि तिचं महत्व कळत पर्यन्त आई झालेलो असतो.. आहे की नाही गंमत?

प्रेम, मैत्री, पालकत्व.. या अगदी सहजपणे अनुभवता येणाऱ्या गोष्टी आहेत. तसंच माझं आणि माझ्या आईचं नातं...
आपला स्वभाव प्रामाणिक असला तर चांगली माणसं आपल्याशी जुळतात...
चांगले विचार, चांगले संबंध जुळत जातात...
'प्रामाणिकपणा' या एका स्वभावामुळे आपण लोकांशी चांगला संवाद साधू शकतो. आपण चांगले राहिलो तर लोकही चांगलेच राहतात यात काही शंका नाही...!

प्रामाणिकपणा या सोबत एक अजून गोष्ट येते ती म्हणजे प्रामाणिक मेहनत. मेहनत ही करायलाच पाहिजे. आपल्या कामाशी प्रामाणिक रहा, आपल्या लोकांशी प्रामाणिक रहा, स्वतःशी प्रामाणिक रहा आणि यातून निव्वळ सुख आणि निखळ आनंदच मिळतो आणि दुःखासाठी कुठलं कारणच उरत नाही.
याचं छान उदाहरण म्हणजे लहानपणी आई मला 'लाकूडतोड्याची गोष्ट' सांगायची ती आपण सगळ्यांनी ऐकलीच आहे.
त्यात शेवटी जे काही घडतं ते प्रत्येकाच्याच आयुष्यात घडेल, जर आपण आपल्या स्वभावाशी, मनाशी प्रामाणिक राहू.
जे काही करायचं ते अगदी प्रामाणिकपणे करा.
आयुष्यात यशस्वी होण्याचं हे खरं सूत्र आहे., कारण माणूस स्वतःच्या मनाशी प्रामाणिक असेल ना तर कोणाची हिम्मत होत नाही त्याच्याकडे बोट दाखवायची.

काही दिवसांपूर्वी एक खुप छान वाक्य वाचण्यात आलं ते म्हणजे...
"रात्री शांत झोप येणे सहज गोष्ट नाही! त्यासाठी संपूर्ण दिवस प्रामाणिक असावं लागतं!



**- अपूर्वा किटकरू भालेराव**

# तुला फक्त तू जन्म देतेस येथे...

गुरवपूर गावात एक श्रमिक जोडपं राहत होतं.लग्नानंतर वर्षभरात त्यांच्या संसारवेलीवर प्राजक्त फुलाने जन्म घेतला.प्राजक्ता ही नावाप्रमाणेच अगदी नाजूक आणि मोहक.. तिला पाहताच दिवसभराच्या कामाचा शीण क्षणात निघून जावा अशी ती प्रसन्नवदना जणू, त्यांच्या संघर्षमय जीवनाच्या वाटेवर चालत असताना जगण्याची नवी उमेद देणारी ती,ऊन्हाचे असंख्य चटके सोसल्यावर सावली बनून एखाद्या उंच डेरेदार वृक्षाप्रमाणे भासावी अशीच होती प्राजक्ता.अत्यंत बिकट परिस्थितीत जीवनाचं रहाटगाडगं चाललं होतं, कधी तर दोन वेळच्या जेवणाचीही शाश्र्वती नसायची,पण प्राजक्ताच्या जन्मानंतर ऋतु बदलावे तसे हळूहळू परिस्थितीतही बदल होत गेले.

प्राजक्ता म्हणजे जणू चैतन्य आणि उत्साहाचा झरा.कितीही संकटं आली तरीही हतबल न होता संकटांवर मात करण्यासाठी सदैव सज्ज असायची.येणाऱ्या प्रत्येक सूर्योदयासोबत एका नव्या संकटाचा जन्म होणार याची कल्पना असतानाही त्या मावळतीच्या केशरी किरणांचा सुहास्य मुद्रेने निरोप घेऊन चंद्र किरणांनी स्वत:ला उजळवत पुन्हा एकदा नव्या पहाटेच्या स्वागताला सज्ज राहण्याचा तिचा स्वभावच होता.कधी अन्नासाठी दाही दिशा,तर कधी शिक्षणापासून वंचितता, कधी जगण्यासाठी परिस्थितीशी लढा देत,तर कधी स्वत:च्या अस्तित्वासाठी समाजाशी दोन हात करत जणू सर्कशीतल्या वाघीणीप्रमाणे कायमच ध्येयपूर्तीसाठी आगीच्या रिंगणातून स्वत:ला झोकून देत यशशिखराची एक-एक पायरी ती चढत गेली.कधी जन्मदात्यांसाठी, कधी आप्तस्वकीयांसाठी, तर कधी समाजासाठी सतत कुणाच्या न कुणाच्या सुखासाठी झटत राहिली,त्या विधात्याला सर्वत्र सुखसमृद्धीसाठी विनवणी करत राहिली.येणाऱ्या प्रत्येक नवा दिवस ज्याच्या आगमनानं सुरू होतो तो रविमित्र दररोज जगण्याची नवी आशा, नवी उमेद,ऊर्जा, सकारात्मकता घेऊन येतो असं म्हणतात,पण प्राजक्ताच्या बाबतीत मात्र तो फक्त उन्हाच्या तप्त झळा घेऊन येणाराच ठरला होता.तरीही वाटेत येणाऱ्या अनेक अडचणींवर मात करत शिक्षण पूर्ण केलं, आणि स्वत: बरोबर समाजाचाही उत्कर्ष व्हावा यासाठी तिचं प्रयत्न करणं सुरूच होतं.

आयुष्याच्या प्रवासात सरळ वाट दिसावी अन् त्या वाटेवरुन सहज ध्येय गाठता यावं असं कधी प्राजक्ताच्या बाबतीत घडलंच नाही, अनेक नागमोडी वळणं,खाचखळगे यांच्या साक्षीनंच ती आजवर मार्गक्रमण करत आली होती.पण या सगळ्यात उदासीनता, हतबलता यांना तिच्या जीवनात तिनं स्थान दिलं नाही,आणि चेहऱ्यावरून प्रसन्नता ढळू दिली नाही.आयुष्याच्या उत्तरार्धात आजवर केलेल्या कष्टाचं फळ म्हणून त्या समाजाचं बदललेलं नवं प्रतिबिंब डोळ्यात साठवून समाधानी होऊन जगू पाहात होती,पण खरं सांगायचं तर संघर्षाने तिची पाठ शेवटपर्यंत सोडली नाही, आणि तिनेही निराश होऊन कधी माघार घेतली नाही.

**शेवटी असं म्हणावंसं वाटतं,की संपूर्ण जीवन केवळ स्वत: साठी न जगता,स्वसुखाचा य: किंचीतही विचार न करता इतरांच्या सुखासाठी,समाजउन्नतीसाठी जगणाऱ्या अनेक प्राजक्ता स्त्रीयांच्या पोटी जन्माला आल्या तर, हिमच्छादित शिखरावर सूर्याची किरणं पडताच त्याची तेजप्रभा चहूदिशांना पसरावी अगदी त्याप्रमाणेच आपल्या देशाची किर्ती दशदिशांना पसरण्यास फार वेळ लागणार नाही..**



**- सौ. तृष्णा आंबेकर**

# स्त्री...!

"स्त्री" हे विधात्याने निर्माण केलेलं एक अद्भुत रसायन. एकाच शरीरात अनेकविध जबाबदार्या अनेक रूप असलेली व्यक्ती म्हणजे स्त्री. जन्माला आल्यापासून अनेक नात्यांनी स्त्री जोडली जाते. सत्व रज तम हे तिन्ही गुण प्रत्येक व्यक्तीच्या ठायी असतात. या गुणांचे प्रमाण कमी जास्त असल्यामुळे प्रत्येक व्यक्ती ही वेगळी जाणवते. मात्र ह्या तिन्ही गुणांचं योग्य मिलन होऊन त्यात जेव्हा ईश्वरीय अंश स्थापन होते तेव्हा स्त्री (स त र ई ) जन्माला येते.

स्त्रीचा जन्म हा नाटकातील बहुरूप्या सारखा असतो. जन्माला आल्यापासून अगदी शेवटच्या श्वासापर्यंत ती कुठली ना कुठली भूमिका ती निभावत असते. तेही अगदी आनंदाने बर का! मूळ तत्व एक असलं तरी प्रत्येक स्त्री ची आपली स्वतः ची अशी एक कहाणी असते. आणि ती कहाणी प्रत्येक जण आपापल्या परीने उत्तम रंगवत असते. निसर्गचक्र सुरळीत सुरु ठेवण्यासाठी त्या विधात्याने " स्त्री" व "पुरुष" या दोघांना जबाबदारी दिली आहे. दोन भिन्न प्रवृत्ती,दोन भिन्न शरीर शास्त्र, भाव स्वभाव असूनही त्यांच्यातली एकरूपताच नवीन सृजन घडवून आणते. नवीन सृजन निर्मितीचं, निसर्गाला पुढे नेण्याचं काम करत असते.

नवीन बीजाला आकारीत,अंकुरित करण्याचं भाग्य स्त्रीच्या पदरी पडलं आहे. आयुष्यातली सगळ्यात मोठी जबाबदारी सृजनशीलता, आई होण्याचं भाग्य.. हे फक्त स्त्री लाच लाभलं आहे. स्वतः चं स्वतःला जन्म देणे यासारखा दुसरा आनंद नाही. स्त्री जशी पुरुषाला जन्म देते,वाढवते तशीच ती स्वतःला (मुलीला) सुद्धा जन्म देते. नऊ महिने स्वतःच्या उदरात मायेने एक बीज रुजवून त्याला चंद्रकलेप्रमाणे वाढवते. त्या बीजाच्या उमलण्याक्षणी त्या उमलण्याच्या वेदनाही स्त्री आनंदाने सहन करते. नवजाताला जन्म देणे म्हणजे तिचा पुनर्जन्मच असे आपल्याकडे म्हणतात. **"एकाच या जन्मी जणू फिरुनी नवे जन्मेन मी"** ही ओळ प्रत्येक स्त्री अनुभवत असते.

डॉक्टर,वकील, अभियंता असं किंवा यासारखं काही तरी प्रत्येक स्त्रीला व्हायचं असतं. बौद्धिक पातळी, आर्थिक परिस्थिती महत्वकांक्षा या सगळ्यात तिची अनेक स्वप्न अवलंबून असतात. मात्र मातृत्व ही एक अशी गोष्ट आहे जी प्रत्येक स्त्री ला हवीच असते. स्त्रीला स्त्रीपण पूर्ण झाल्याची जाणीव हे मातृत्वचं देत असतं. "मला आई व्हायचंय" हे कुठल्याही स्त्रीला बोलून दाखवण्याची गरज नसते. आई होणं ही एक हवीहवीशी जबाबदारी आहे. एका नवीन कोवळ्या जीवाला जन्माला जन्म देऊन त्याला वाढवणे हा प्रत्येक स्त्रीचा आवडता जॉब आहे तो सुद्धा विनामोबदला. ज्याप्रमाणे एखादा कुंभार मडकं बनवतांना बाहेरून त्याला ठोकतो आणि सोबतचं आतून नाजूक मायेने हातही फिरवतो. त्याच सारखं काहीसं स्त्री आपल्या आईपणाच्या भूमिकेत वागत असते. प्रसंगी कठोर, प्रसंगी मृदू होऊन ती त्या नवजीवाला वाढवत असते. संपूर्ण आयुष्यात नानाविध भूमिका निभावणारी स्त्री. आई ही भूमिका अगदी आनंदाने आणि जास्त दक्षतेने पार पाडत असते.



**- मृण्मयी सारंग**

# बाळा जो जो रे...

तिची बाग फार छान फुलली होती. गुलाब , जाई जुई , मोगरा , प्राजक्त , रातराणी , बकुळ आणि तिच्या मनात अन् बागेत घमघमणारा सोनचाफा....! ज्याच्या सावली खाली तिला तिच्या आजीच्या कुशीत शिरल्याचा आनंद मिळायचा... रोज अगदी नेम असल्या प्रमाणे रात्रीचं जेवण झाल्यावर त्या सोनचाफ्याच्या खाली बसून ती जणू काही तिच्या आजीला , म्हणजेच त्या सोनचाफ्याला दिवसभरात घडलेल्या साऱ्या , साऱ्या गोष्टी सांगायची आणि आजी सुद्धा ; हो मी ऐकतेय असा संदेश सोनचाफ्यासमवेत तिच्या ओंजळीत घालायची!

अगदी लहापणापासूनच आजी आणि ती खूप छान मैत्रिणी होत्या . एखादं कठीण गणित सोडवण्यापासून ते तिची आणि तिच्या मैत्रिणींची भांडणं सोडविण्या पर्यंत ती तिच्या आजीला स्वतः सोबत घेतल्या शिवाय राहत नसे . तिच्या तिसऱ्या वाढदिवसाला आजीने लावलेलं ते सोनचाफ्याचं झाड तिच्या बरोबरीने वृद्धिंगत होत गेलं .

ती दहावी नंतर कॉलेजात शिकायला गेली. तिच्या गोड स्वभावामुळे लवकरच तिचे नवे मित्र मैत्रिणीही तिला मिळाले . पण आजी आणि ती अजुनही तेवढ्याच घट्ट मैत्रिणी होत्या. रोज दिवे लागणीच्या नंतर सोनचाफ्याच्या झाडाखाली बसून दोघी मनमुराद गप्पा मारत...ती तिच्या आजीला सगळं सगळं सांगायची ! अगदी पहिल्यांदा त्याच्या प्रेमात पडल्यावरही सगळ्यात आधी तिने तिच्या आजीलाच सांगितलं होतं...!

सारं काही छान सुरू असताना , शांत पाण्याच्या डोहात कुणीतरी दगड मारल्या सारखं झालं आणि असंख्य तरंगे निर्माण झाली . हृदय विकाराच्या तीव्र झटक्याचं कारण झालं आणि आजीला देवाज्ञा झाली. दुसऱ्याच क्षणी ती पोरकी झाली. एकटी पडली. बोलकी , हसरी ती , आजीच्या जाण्याने एकाकी शांतच झाली . तिच्या सजल नयनांनी ती आभाळ निरखत असताना आजीच्या आवडत्या गाण्याचे शब्द रेडिओतून हलकेच तिच्या कानावर आले.... " चाफा खंत करी , काही केल्या फुलेना... चाफा बोलेना , चाफा चालेना... " या शब्दांची भर तिच्या भावनांमध्ये पडली आणि ती आजीच्या आठवणीने कासावीस होवून सोनचाफ्याच्या कुशीत शिरली. कळवळून रडू लागली.... तोच तिच्या दुःखावर फुंकर घालायला मंद वाऱ्याची झुळूक आली . तिच्या अंगावरुन मायेने कुणीतरी हात फिरवावा तसा तो वारा तिला स्पर्श करून गेला ; आणि तेवढ्यातच तिला शांत झोप लागली.... तिच्या आजीच्या कुशीत शिरल्यासारखी ती आश्वस्त निजली होती . आणि कानात तिच्या आजीच्या गाण्याचे शब्द गुंजत होते.....

**" पापणीच्या पंखात झोपू दे , डोळ्यांची पाखरे.... बाळा जो जो रे....बाळा जो जो रे...."**



**-भार्गवी बाबरेकर**

# " स्त्री'च पण ,आई हवी मम्मी नको "

**आई तुझ्याच ठायी , सामर्थ्य नंदिनीचे , सतेज पौर्णिमेच्या , त्या शांत चंद्रिकेचे .' - यशवंत**

आपल्या मराठी भाषेत अनेक शब्द आहेत . पण जो शब्द उच्चारला असता त्रिभुवनातील सारी सुखें तुच्छ वाटतात ! असा एकच शब्द आहे , आणि तो म्हणजे **'आई'.** हा अनुभव ज्या आई आहेत त्यांना नवा नाही. जगातील पावित्र्य ,औदार्य , स्वार्थत्याग , उपकारीपणा या साऱ्या गुणांची मूळ जर कोणती असेल तर ती आई हीच आहे . **महाराष्ट्रीयन संस्कृतीला प्रेमाचा पाझर फोडणारा एक शब्द म्हणजे 'आई'**

आता मातृभाषेतून हद्दपार होऊ पाहत आहे . आपल्या मायबोलीतील ' आई ' हा शब्द आपणच का हरवावा ? "मम्मी" म्हटल्यामुळे प्रेम वाढेल असे नाही , तर मग परकिय विचारांची भीक आपण का घालावी ? **" निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई ! आज माझ्या पाडसाला झोप का गं येत नाही ?"** हे हृदयस्पर्शी अंगाई-गीत गाताना आकाशातील चांदोबा दाखवीत , बाळाला पाळण्यात जोजवणारी ' आई ' आता त्याला " Twinkle Twinkle Little star " हे म्हणत मम्मीच्या रुपात केव्हा स्वीकारली गेली हे तिलासुद्धा कळलेच नाही . आईचे हे बदलते स्वरूप साकारण्यात मला असे वाटते आईसुद्धा जबाबदार आहे . मिस् , मॅडम , सिस्टर ह्या शब्दात स्वतःला सोपवून धन्य मानू लागली तर , आजची तरुण पिढीसुद्धा यापेक्षाही एक पाऊल पुढे टाकणार यात शंका नाही .

भारत स्वतंत्र झाला तरीही पाश्चात्य संस्कृतीचा पगडा भारतीयांच्या मनावर अजूनही कोरलेला आहे . आपल्या जन्मभूमीलाच नव्हे तर जन्मदात्रीला सुद्धा आपण विसरत चालेलो आहे . आई , बाबा , गुरुजी हे शब्द वापरणारे लोक कमी दर्जाचे व अशिक्षित मानले जातात. पिढयांपिढयांमधील हे अंतर वाढत चालले आहे . वृक्ष लावायचे असल्यास त्याचे बीजारोपणसुद्धा योग्य व्हायला हवे .शिवाय, त्याला खतपाणी देखील वेळोवेळी घालायला हवे म्हणजे मिळणारे फळ हे रसाळ आणि अमूल्य असेल . आपले आयुष्य देखील असेच आहे जसे , आपल्यावर संस्कार घातले जातील तसेच आपले वर्तन असेल . आपण जर आपल्या संस्कृतीचा घात करणार असू तर उमलत्या कळ्यांकडून काय अपेक्षा ठेरणार ?

एकविसाव्या शतकाला कंप्युटर चे युग असे म्हणतात . यांत्रिकीकरणामुळे माणसांमाणसांमधील मेलमिलाप वाढला . इंटरनेटमुळे सातासमुद्रापार व्यक्तींशी सवांद साधता येऊ लागला . पण मायेचा ओलावा मात्र कमी होऊ लागला . मोबाईलमुळे माणसे जवळ आली मात्र मनाने दूर गेली . ज्या देशात धरणीला माता संबोधण्यात येते आता त्याच जन्मदात्रीला 'मम्मी' समजण्यात येते . आईला मम्मी म्हणून तिला जिवंतपणीच मृत म्हटल्या जाते .

Mummy ह्या लॅटिन भाषेतून आलेल्या शब्दाने आईचे शवा मध्ये रूपांतर केले. Mumia या शब्दापासून तयार झालेला हा शब्द केवळ भारतावरच नाही तर संपूर्ण जगात वर्चस्व गाजवू लागला अर्थ -

वैद्यकीय भाषेत ममीचा अर्थ -

" माणसाच्या किंवा जनावरांच्या शारीराला कुजण्यापासून वाचवण्याकरिया विविध रसायने वापरून प्रक्रिया करणे किंवा मृतदेह साठवण्याकरिता तयार करणे ."

पाश्चात्य संस्कृतीच्या झगमगाटीत मुले जर आई-वडिलांनाच विसरलीत तर उद्याच्या भारत देशाची काय अवस्था होईल ह्याचा विचार न केलाच बरा ! पूर्वीच्या काळात आई म्हणजे मायेची साठवण आणि ममतेचा सागर . मात्र काळानुरूप आईसुद्धा बदलत गेली आणि एकविसाव्या शतकात अनेकांना आई ऐवजी मम्मी मिळाली . फॅशनच्या नावाखाली रीतिरिवाज बदलले , वागण्याबोलण्यातील शब्दांनी मर्यादा ओलांडल्या पण 'आई' चे प्रेम मात्र कमी झाले नाही . आई ही 'आई'च राहणार आणि राहावी म्हणूनच आपण सर्वांनी तिचा 'आई , माऊली , माता' या योग्य शब्दाने सन्मान करावा .

" आईसारखी आईच ! तिला दुसरे उपमानच नसते ,आई खरचं काय असते ?"



**-निर्मिती देवलसी**

# थोडं तिच्याविषयी...!

आपल्या बद्दल बोलता बोलता कधीतरी तिच्याबद्दल सुद्धा बोलायला हवं हे कुठंतरी राहून जातं. खरंतर ती आहे म्हणून आपण आहोत हे अगदी त्रिकालाबाधित सत्य. आज एक स्त्री म्हणून समाजात जगत असतांना हे सगळं आपल्याबद्दलच आहे असं हळूहळू वाटायला लागलंय..

मुलगी म्हणून जन्माला येणं हे किती भाग्याचं असतं हे आज स्त्री झाल्यावर उमजतंय. ती म्हणजे कोण? तर ती म्हणजे घरात वावरणारं चैतन्य, आनंद. साक्षात शिव सुद्धा शक्तीशिवाय अपूर्ण आहे असं म्हणतात तेव्हा आपल्यात काहीतरी खास आहे याची जाणीव व्हायला लागते.

तिचा जागर होतो तो फक्त नवरात्रातल्या नऊ दिवसांमध्ये. त्याशिवाय तिचा वाढदिवस असेल तर मातृदिन महिला दिन असेल तर म्हणजेच काय ठराविक दिवशीच तिचं महत्व जास्त प्रकाशित होतं पण इतर दिवशी तिच्याकडे सामान्य म्हणून बघितलं जातं. महाराष्ट्रात तरी स्त्री विषयी आदर बघायला मिळतो पण आजही उत्तर प्रदेशात स्त्री भ्रूण हत्येचं प्रमाण कुठेतरी दिसतंच. यालाच काय स्वतंत्र देश म्हणायचा?

तिच्याविषयी बोलायचं म्हंटलं की, अमर्याद असलेल्या शक्तीला शब्दमर्यादेत कसं बसवावं हाच प्रश्न पडतो. ती असेल तर सृजन आहे ती नसेल तर कसे वंश वाढणार? सकारात्मक बोलण्यापेक्षा नकारात्मक विचार आधी डोक्यात घर करतात. एक दिवस तिचा साजरा करण्यापेक्षा रोजच का नसावा तिचा स्वतःचा असा दिवस? तर नक्कीच असायला हवा. देश बदलतोय हे उत्तम आहे पण इतर विकसांबरोबर स्त्री विषयी असणाऱ्या विचारांचा सुद्धा विकास आपण करायला हवा. वासनेच्या नजरेतून तिला न बघता एक शक्तीस्थान म्हणून आपण बघायला हवं तरंच हा देश विकसित आहे असं म्हणता येईल असं मला वाटतं. समस्त मातृशक्तीला माझा प्रणाम...!



**- सौ. प्रांजली बाविस्कर**

# मला कळलेली ती...

**या देवी सर्वभूतेषु मातृरूपेण संस्थिता।, नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।**

युगंधर ही कादंबरी वाचत असतांना त्यात असलेल्या "रुक्मिणी" च्या मनोगताची सुरुवात म्हणजे मला कळलेली ती. त्यात असं लिहिलंय की, स्त्री ला तिच्यात असणार्या शक्तीकेंद्राचा शोध लागला ना की ती मागे वळून पाहतच नसते मुळी ! किती बोलकं आहे ना हे वाक्य? या एका वाक्यासरशी मला अगदी इतिहासापासून ते आजच्या एकविसाव्या शतकापर्यंतचा प्रवास अगदी डोळ्यासमोरून तरळून गेला. वेद उपनिषद अनेक स्मृतिग्रंथ त्या शक्तीचं वर्णन करण्यास समर्थ ठरले. आपल्या भारतीय संस्कृतीची ओळख म्हणजेच तिची पूजा तिच्यातल्या उर्जेची पूजा. आणि याच उत्तम उदाहरण म्हणजे रामकृष्ण परमहंस आणि सारदादेवी. अशी अप्रतिम अतुलनीय परंपरा लाभलेला आपला भारत देश. ज्या भारताची उपास्य देवता ही सुद्धा एक स्त्री आहे ती म्हणजे भारत माता असा समृद्ध इतिहास असताना आपण या भारतात जन्मलो याचा सार्थ अभिमान वाटतो.

एक स्त्री म्हणून जन्माला येण्याचा आनंद जर अधिक द्विगुणीत करायचा असेल तर झाशीची राणी, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जीजामाता यांना वाचलं की आपल्यात असणार्या शक्तीकेंद्राची जाणीव होऊन फक्त पुढेच जात रहाव असा विश्वास मनात निर्माण होतो. मला असं प्रामाणिकपणे कायम वाटतं की अश्या ध्येयवेड्या आणि उर्जेने ओतप्रोत असलेल्या तेजस्विनीचे चरित्र जर आपण वाचले तर मनात कधीही नकारात्मक विचार भावना प्रवेश करू शकणार नाही आणि समजा प्रवेश केलाच तर यांच्या चरित्रात असलेली सकारात्मकता त्यांच्यावर मात करेल. आपल्या इतिहासातल्या प्रत्येक स्त्री कडे एक एक असीम विश्वास आणि अतुलनीय पराक्रम होतात. "क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे" या उक्तीचा अवलंब प्रत्येकीने केलेला आहे.

एका घराला घरपण देण्यापासून तिचा प्रवास सुरु होतो. आधी कन्या म्हणून पितृगृही ती बालिका म्हणून वावरते. मग ती बालिका कन्या होते कालांतराने वधू होऊन पतीच्या घरी येऊन दुहिता होते जेव्हा ती सासरच्या घरचं माप ओलांडते तेव्हा गृहलक्ष्मी म्हणून घरात प्रवेश करते. म्हणुनच तिला गृहिणी म्हणतात. पु ल म्हणतात स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळाची माता असते ही काही चुकीचे नाही. त्याच मातृशक्तीमुळे आज आपण आहोत. म्हणूनच म्हणावसं वाटतं की,

"तिला समजून घेणं फार कठीण नक्कीच नाही. प्रयत्न असावा समजून घेण्याचा. मग ती दिसेल कुठल्याही शक्तीरुपात, ओळखता यायला हवं आपल्याला. शक्तीची उपासना फक्त नवरात्रात करून होत नाही उलट नवरात्रात अधिक उर्जा मिळते तिच्यातल्या शक्तीला. इतिहास घडून जातो आपण अगदी आंधळेपणाने त्याच इतिहासाची पानं पलटवत पुढे जातो वर्षांमागून वर्ष महिन्यामागून महिने असे कालगती नुसार उलटत जातात. ती कायमच तिथे असते तिच्या शौर्याची गाथा तिचा संघर्ष आपल्याला कायमच खुणावत असतो कायमच सकारात्मक उर्जा देत जातो. बरेच दिवसांनी आपल्या दु:खाला कवटाळत आपण देत बसतो नशिबाला दोष.मानवी स्वभावाप्रमाणे स्मरणाप्रमाणे विस्मरण लगेच होतं आपल्याला. दु:खात मग आठवत बसतो नको नको त्या इतिहासाला.

**निमित्य काही का असेना मन परत इतिहासातल्या पानांमध्ये रमायला लागतं, तिचा पराक्रम आठवायला लागतं मनात स्फुल्लिंग चेतवलं जातं आणि परत एकदा तिलाच तिच्यातल्या शक्तीकेंद्राचा शोध लागतो कारण मात्र काहीही असलं तरी एकमात्र खरं असतं तिला जागृत करणारं तिला शक्ती देणारं इतिहासातलं पान असतं काहीही वेगळं नाव नसलं त्याला तरी ते जगावेगळं असतं कारण**

ते "ती" चं पान असतं! ते "ती" चं पान असतं! आणि ते फक्त आणि फक्त " ती" चं पान असतं !



**- सौ. सायली अक्षय देशपांडे**

# समारोप......!

"ती" चं पान. जे फक्त तिचं असेल तिच्या हक्काचं असेल. तिच्या भावनेला शब्दबद्ध करण्याचं एक माध्यम. या माझ्या संकल्पनेला सगळ्यांनी आनंदाने होकार दिला आणि कुठल्याही चांगल्या हेतूने सुरुवात केलेलं कार्य हे सिद्धीस जातं याचं प्रमाण म्हणजे हे आगळंवेगळं मासिक असंच मी म्हणील..यात ज्यांनी ज्यांनी लेख लिहिले कविता लिहिल्या या सगळ्या माझ्या आकाशवाणीतल्या सख्यांचं माझ्यावर आणि वाचन आणि लेखन संस्कृतीवर असलेलं प्रेम असंच राहावं अशी इच्छा व्यक्त करते आपण हा छोटासा प्रयत्न गोड मानुन घ्याल या अपेक्षेसह माझ्या लेखणीला विराम देते.

धन्यवाद ...!





मॅगझिन कव्हर पेज क्रीएटर:- ओंकार देव

संपर्क:- ७०३०२७७०६४